# नाशिक महानगरपालिका, नाशिक

मुल्य निर्धारण कर संकलन विभाग

राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, नाशिक – ४२२००२

---

## निविदा नोटिस क्र. ०२ (सन २०१७-१८)

| | |
|---|---|
| **कामाचे नांव :** | मालमत्ता व पाणीपट्टी थकबाकीदार यांचे मिळकती समोर ढोल वाजविणे कामी ढोल पथक नियुक्त करणे बाबत |
| **कामाची मुदत :** | २० दिवस |
| **निविदा विक्री करण्याचा कालावधी** | दिनांक ०६/०२/२०१८ ते दि. ०८/०२/२०१८ पावेतो (दुपारी ०२.०० वाजेपर्यंत) |
| **निविदा दर पत्रक सादर करण्याचा कालावधी व निविदा फॉर्म जमा करण्याचे ठिकाण** | दिनांक ०८/०२/२०१८ पावेतो (दुपारी ०३.०० वाजेपर्यंत) मा.उप आयुक्त (गोसंक), मुल्य निर्धारण कर संकलन विभाग, राजीव गांधी भवन, मुख्यालय, मनपा,नाशिक. |

प्राप्त सील बंद पाकीट हे शक्य असल्यास, दिनांक ०८/०२/२०१८ रोजी दुपारी ३.३० वाजता शक्य झाल्यास मा.उप आयुक्त (गो.सं.क), मुल्य निर्धारण कर संकलन विभाग, राजीवगांधी भवन, मुख्यालय, मनपा, नाशिक यांच्या दालनात उघडण्यात येतील. तसेच निविदा देकार स्विकारणे अथवा नाकारणे या बाबतचे अंतिम अधिकार मा.उप आयुक्त (गोसंक), नाशिक महानगरपालिका नाशिक यांचे राहतील.

सही/-

**उप आयुक्त (गोसंक)**
**मुल्य निर्धारण कर संकलन विभाग**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**

## दर पत्रक

| अ.क्र. | तपशील | ढोल पथक वादक संख्या | प्रती ढोल पथक वादक दर र.रु. | सहा पथकांचे एकुण प्रतिदिन र.रु. | एकुण दिवस | एकुण र.रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | वादक साहित्या सह २ मोठे ढोल वादक व १ ताशा वादक असे तिन वादकांचे १ पथक, यानुसार सहा विभागीय कार्यालयासाठी एकुण १८ वादक. | ०६ | | | २० | |
| | | | | | एकुण | |

अक्षरी र.रु. ---------------------------------------------------------------------------

निविदेतील नमुद सर्व अटि व शर्ती मी वाचन केले असुन त्या माझ्यावर बंधनकारक असुन मला त्या मान्य आहेत, त्याअनुसरुन मी वरील दर हे सर्व करासहित (जि.एस.टी, चढाई, उतराई, हमाली व इतर सर्व करा सह) निविदा दर दिलेले आहेत व ते मला मान्य आहे.

**मक्तेदाराची सही / शिक्का**

# <u>सर्वसाधारण निविदा अटी-शर्ती</u>

१) मक्तेदारांनी त्यांचे दर हे महानगरपालिकेने पुरविलेल्या दर पत्रक www.nashikcorporation.gov.in या संकेतस्थळावरुन डाउनलोड करुन दिलेल्या नमुन्या मध्ये सुस्पष्ट देण्यात यावे, नमुद केलेल्या दर पत्रकातील प्रत्येक रकान्याची माहिती पुर्ण भरणे गरजेचे आहे त्यात खाडाखोड नसावी. तसेच मक्तेदारांनी दर भरतांना सर्व करासहित (जि.एस.टी., चढाई, उतराई, हमाली व इतर करा सह) दर भरणे आवश्यक आहे.

२) निविदे बाबत काही वाद निर्माण झाल्यास निम्नस्वाक्षरीकार यांचा निर्णय अंतिम राहिल.

३) मक्तेदारांच्या कोणत्याही प्रकारच्या अटीशर्ती मान्य केल्या जाणार नाही, अटीशर्ती असलेल्या निविदा बाद करण्यात येतील.

४) कामाचा मक्ता स्विकारण्याची मुदत ८ दिवसाची राहील. न्युनतम मक्तेदाराने जर काम स्विकारले नाही तर सदर काम दुस-या मक्तेदारास (Risk & Cost) वर देण्यात येईल. त्या बाबत दुस-या मक्तेदारास काम दिले बाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा/नोटिस दिली जाणार नाही.

५) मक्तेदारास सदर कामाचे कोणत्याही प्रकारचे अगाऊ (Advance) बिल देण्यात येणार नाही.

६) दर पत्रकामध्ये दर इत्यादी लिहीतांना काही दुरुस्ती अथवा खाडाखोड केलेली असल्यास त्या ठिकाणी मक्तेदाराचे स्वाक्षरी व शिक्का असणे आवश्यक आहे. तसे नसल्यास सदर दरांचा विचार केला जाणार नाही व अशा प्रकारची निविदा बाद ठरविण्यात येईल.

७) सदर अटिशर्ती मधील एखाद्या निविदा अटी शर्ती बाबत शिथिलता देणेस अथवा आवश्यक अशा काही अटीशर्तीचा समावेश करणे इ. बाबतचे अधिकार नाशिक महानगरपालिकेने राखुन ठेवण्यात आले आहे.

८) मक्तेदारांनी सर्व करासहित (जि.एस.टी., चढाई, उतराई, हमाली व वाहतुक खर्च इ. सर्व करांसहीत) निविदा दर भरणे आवश्यक आहे त्याव्यतिरिक्त इतर कोणताही कर किंवा नविन कर लागु झाल्यास असा कोणताही कर मनपातर्फे अदा केला जाणार नाही. तसेच मक्तेदाराने स्वतःच्या जबाबदारीवर, विचार करुन व सर्व स्थानिक परिस्थिती नुसार, स्वतःचे समाधान होईल व सर्व निविदेतिल अटीशर्ती व त्यामधिल तांत्रीक माहिती इ. अवलोकन करावे व काम करण्याचे ठिकाणे, नैसर्गिक परिस्थिती, इत्यादी माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच काही भुल, शंका किंवा अडचणी असतील त्या उप आयुक्त (गोसंक) यांचेकडे दरपत्रक सादर करण्यापूर्वी खात्री कराव्यात, नंतर मक्तेदाराची कोणतीही शंका असल्यास विचारात घेतली जाणार नाही व महानगरपालिका त्यास जबाबदार राहणार नाही याची मक्तेदाराने नोंद घ्यावी.

९) निविदे बाबत मक्तेदार व नाशिक महानगरपालिका यांचे मध्ये वाद विवाद निर्माण झाल्यास संबंधीत दावे खटले हे मे. नाशिक कोर्टात दाखल करणे बंधनकारक आहे.

१०) <u>कामे पार पाडण्याची पध्दतः</u>- कोणतेही कामाची अंमलबजावणी करण्यापूर्वी मुनिकस विभागाचे विभागप्रमुख अथवा मा.उप आयुक्त (गोसंक) यांची पुर्व परवांनगी घेतले नंतरच सदर कामे करावी, मनपाच्या संबंधीत अधिका-यांनी तयार केलेले नियम व अटी पध्दतीमध्ये मनपाचे नियुक्त अधिकारी योग्य बदल सुचवू शकतात, त्याचे पालन करणे मक्तेदारावर बंधनकारक राहील.

११) सार्वजनीक हित संबंध - मनपाच्या अधिका-यांनी मक्ता कालावधी मध्ये वेळोवेळी दिलेल्या स्थानिक किंवा सार्वजनिक हिता संबंधी सर्व योग्य अथवा शासकीय कायदेशीर आदेश आणि निर्देश यांचे पालन करणे बंधनकारक आहे.

१२) कामाच्या ठिकाणी मक्तेदाराच्या कर्मचा-यास काम करतेवेळी कोणताही अपघात झाल्यास अथवा नुकसान झाल्यास तसेच आर्थिक व जिवितहानीस झाल्यास मक्तेदार स्वतः जबाबदार राहील. त्याबाबत मनपा कोणताही मोबदला अदा करण्यात येणार नाही.

१३) मक्तेदाराने शासकीय व निमशासकिय परवानग्या इत्यादी बाबतचे सर्व शुल्क स्वखर्चाने करावे.

१४) **<u>करार रद्द करणे</u>** - आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना करार रद्द करण्याचे सर्व अधिकार राहतील व त्याकामी खालिल प्रमाणे करार रद्द करण्याची पध्दत अवलंबण्यात येईल -

अ) मक्तेदारास कारणे दाखवा नोटिस देण्यात येईल, मक्तेदाराने १० दिवसाच्या आत लेखी खुलासा सादर करणे बंधनकारक आहे. समाधानकारक उत्तर प्राप्त न झाल्यास करार संपुष्टात आणण्याची पुढिल कार्यवाही करण्यात येईल.

ब) नाशिक महानगरपालिकेस गरज वाटल्यास इतर कोणतेही स्पष्टीकरण मक्तेदाराकडे मागता येईल.

क) विहित कालावधीत कारणे दाखवा नोटिसचे प्राप्त प्रत्युत्तर अथवा प्राप्त न झालेला खुलासा या बाबत आयुक्त नाशिक मनपा यांचेकडे सविस्तर लेखी रिपोर्ट सादर करण्यात येईल. त्यानंतर या बाबतीत मा.आयुक्त सो। यांचे निर्देशानुसार उप संधी देण्यात येवून मक्तेदाराची सुनावणी घेण्यात येईल.

ड) करार संपुष्टात आणणे बाबत आयुक्त नाशिक महानगरपालिका यांचे निर्णय अंतिम असतील व ते मक्तेदारावर बंधनकारक आहे. मात्र जो अंतिम निर्णय झाला असेल तो मक्तेदारास लेखी कळविण्यात येईल.

इ) करार संपुष्टात आणल्यानंतर मक्तेदारास कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई अदा केली जाणार नाही. मात्र मनपाचे नुकसान झाल्यास ती मक्तेदाराकडून वसुल करण्यात येईल. सदरची नुकसान भरपाई मक्तेदाराने देणे बंधनकारक राहील.

ई) मक्ता कालावधीत राहिलेले काम मक्तेदाराच्या (रिस्क ॲन्ड कॉस्ट) व्दारे दुस-या मक्तेदाराकडून उर्वरित कालावधीसाठी काम देण्यात येईल. तसेच आर्थिक नुकसानी पोटी व इतर संबंधीत बाबीं करीता मक्तेदारा विरुध्द, आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना मा.न्यायलयात दावा दाखल करण्याचे पुर्ण अधिकार राहतील.

१५) दिलेल्या कालावधीत काम पुर्ण न केल्यास र.रू. ५००/- इतका दंड प्रति दिवस आकारण्यात येईल.

१६) ढोल वाजविण्याचा कालावधी प्रती दिन (वेळ सकाळी ८:३० ते सायंकाळी ६:०० वाजे पावेतो) कामाच्या आदेशात नमुद तारखेपासून २० दिवसा करीता मनपाचे ६ विभागातील क्षेत्रात मनपा अधिका-यांच्या सुचनेनुसार करणे बंधनकारक आहे.

१७) ढोल पथके हे राजीव गांधी भवन अथवा मनपा निश्चित करेल अशा ठिकाणी सकाळी ८.३० वाजे पर्यंत हजर असणे बंधनकारक.

१८) ढोल वाजविणे बाबतच्या इतर परवानग्या मनपामार्फत घेण्यात येतिल.

१९) ज्या मक्तेदाराचे दर पत्रक मंजुर करण्यात येईल त्या मक्तेधारकाने नाशिक महानगरपालिकेचे लाभात र.रु.१२०/- चे जनरल स्टॅम्पपेपर वर रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. तसेच एक सक्षम जामीनदार द्यावा लागेल.

२०) सदरचे मंजूर दराने कराराचे मुदतीपर्यंत वेळोवेळी गरजेनूसार पथक उपलब्ध करून देणे बंधनकारक राहील.

२१) दिलेल्या मक्ता प्रमाणे मुदतीत ढोल पथक उपलब्ध न झाल्यास, मक्ताधारकाच्या जबाबदारीवर इतर ढोल पथकांमार्फत काम करुन घेण्यात येईल. आणि त्या पथकास महानगरपालिकेच्या मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो मक्तेदाराकडून वसुल करण्यात येईल.

२२) ढोल पथका मधील एकही वादक कमी असता कामा नाही तसेच वादका करीता असलेले साहित्य ढोल व ताशा हे चांगल्या स्थितीत असणे बंधनकारक. वादक कमी आढळून आल्यास प्रती ३ वादक समान जाणा-या रक्कमेपैकी रक्कमेचा एक भाग कपात करण्यात येईल.

२३) अटी/शर्तीमधील एखाद्या शर्तीबाबत काही सवलत देणे अथवा आवश्यक अशा काही जादा अटी घालण्याबाबत महानगरपालिकेस अधिकार राहील.

उपरोक्त अटीशर्ती व्यतिरिक्त करारनाम्यामध्ये इतर अटीशर्तीचा समावेश करण्यात येईल.

वरील अटीपैकी कोणत्याही अटींचे उल्लंघन झाल्यास करारनामा रदद् तसेच परवानगी रदद् करण्याचा अधिकार आयुक्त नाशिक महानगरपालिका यांना राहील.

सही/-

**उप आयुक्त (गो.सं.क.)**
**मुल्य निर्धारण कर संकलन विभाग**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**